जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-34/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 21.01.2021

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) चे प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. मोहीनी विजय येवनकर,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 29.01.2021 रोजी दुपारी 03.00 वाजता ONLINE व्दारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**विषय क्रं. 01**

दिनांक 01.07.19 ची अंदाजपत्रकिय विशेष सभा, 17.07.19 ची अंदाजपत्रकिय विशेष सभा, 08.08.2019, 11.09.2019 विशेष सभा, 22.11.2019, 19.03.20, 13.07.20 अंदाजपत्रकिय विशेष सभा व 17.07.20 ची अंदाजपत्रकिय विशेष सभा व दिनांक 22.09.2020 ची विशेष सर्वसाधारण सभेच्या मागील झालेल्या सर्वसाधारण सभेच्या सर्व इतिवृत्त कायम करणे बाबत.

**विषय क्रं. 02**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.121/नवि-24 दिनांक 28.12.2020 अन्वये नांदेड वाघाळाशहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहाय्यक वै'किय आरोग्य अधिकारी हे पद अस्तित्वात नसल्यामुळे डॉ. बालाप्रसाद कुटूंरकर यांना या पदावर मान्यता देता येणार नसल्याबाबतची बाब महानगरपालिका प्रशासनाने प्रशासकीय टिप्प्णीव्दारे सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणुन दिली असे असुनही सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 93 दिनांक 14.10.2016 समंत केला आहे.

उपरोक्त ठराव क्रं. 93 दिनांक 14.10.2016 हा प्रशासकिय टिप्पणीच्या विरुध्द असल्यामहे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 451 अन्वये विखंडीत करण्याबाबतचरी विनंती आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी दिनांक 12.04.2019 च्या पत्रान्वये शासनास केलेली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानरपालिकेच्या आस्थापनेवर सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी हे पद अस्तित्वात नाही त्यामुहे डॉ. बालाप्रसाद कुटूंरकर वैद्यकिय अधिकारी यांना सर्वसाधारण सभेने समंत केलेल्या ठरावानुसार सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर काम करण्यास परवानगी देण्याचा मानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 93 दिनांक 14.10.2016 हा नियमानुसार नाही.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेल्या वस्तुस्थितीनुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी हे पद अस्तित्वात नाही त्यामुळे डॉ. बालाप्रसाद कुटूंरकर वैद्यकिय अधिकारी यांना सर्वसाधारण सभेने समंत केलेल्या ठरावानुसार सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर काम करण्यास परवानगी देण्याचा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 93 दिनांक 14.10.2016 हा नियमानुसार नसल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महनगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 (1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबित करण्यात आलेला असुन **त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अनुशेष भरती अंतर्गत **श्री पुंडलीक गंगाधरराव मोरे** यांना अनु. जमातीसाठी राखीव असलेल्या लिपीक या पदावर सहा महीन्याचे आत जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास देण्यातआलेली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल या अटीवर कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/8777/09 दिनांक 19.01.2009 अन्वये प्रथम सहा महिन्यांकरिता नेमणुक देण्यात आली होती.

तदनंतर अनु.जमातीचे जातवैधता प्रमाणपत्राची पुर्तता केली नसल्यामुळे आणि शासन निर्णयानुसार सेवेच संरक्षण मिळवु शकत नसल्यामुळे संबधीतास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपवा/अस्था-1/4359/11 दिनांक 01.10.2011 अन्वये सेवेतुन कमी करण्यात आले आहे.

तथापि सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. बीसीसी 2018/प्र.क्र.308/16-ब दिनांक 21.12.2019 नुसार श्री पुंडलीक गंगाधरराव मोरे यांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-5/2271/20 दिनांक 29.06.2020 अन्वये लिपीक या पदाच्या अधिसंख्य पदावर तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्यांकरिता शासन निर्णयाच्या व अधिसंख्य पदास शासन मान्यतेच्या अधिन राहुन अधिसंख्य पदावर नेमणुक देण्यात आली आहे.

श्री पुंडलीक गंगाधरराव मोरे यांनी दिनांक 16.10.2020 रोजी अर्ज सादर करुन जुलै 2009 ते 30.09.2011 मध्ये कार्यालयात हजर असतांनाचे वेतन मिळणेकरिता विनंतरी केली आहे. लेखा विभागाच्या अहवालानुसार संबंधीतांना नियुक्ती दिनांकापासुन जुलै 2009 पर्यंतचे 07 महिन्यांचे वेतन अदाई करण्यात आले असुन, ऑगस्ट 2009 ते 30.09.2011 पर्यंत कार्यालयात कर्तव्यावर हजर असतांनाचे वेतन अदा केल्याचे दिसुन येत नाही.

मुख्यलेखा परिक्षक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 365 नुसार संबंधीतांचे वेतन अदाईस 01 वर्षापेक्षा अधिकचा कालावधी झालेला असल्यामुळे ऑगस्ट 2009 ते 30.09.2011 पर्यंतचे वेतन अदाई करणेसाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 04**

मा. उपसचिव उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई व ग्रथालय संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रशासकिय विभागातर्गत विविध कायदा/अधिनियम/नियमाव्दारे स्थापित केलेल्या शासकीय/अशासकीय मंडळे व समित्यावर नव्याने समित्या व मंडळे पुर्नरगठीत करण्यासाठी विभागनिहाय

स. सदस्यांची व्यक्तीगत माहितीसह राज्य ग्रंथालय परिषदेवर नांवे सादर करण्यास (1) मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक मराग्रं/2020/प्र.क्र.13/2020/साशि-5 मंत्रालय विस्तार मुंबई-32 दिनांक 06 जानेवारी 2020 (2) मा. ग्रंथालय संचालक यांचे पत्र क्रं. 34/राग्रंपपु/ 2020-21/3207-3248 दिनांक 03.11.2020 (3) जिल्हा ग्रंथालय अधिकारी नांदेड यांचे पत्र क्रं. जिग्रंअना/2020-21/252 दिनांक 05.11.2020 पत्रान्वये कळविलेले आहे.

त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके निवडून आलेल्या सदस्यांची नांवे व त्यांची व्यक्तीगत माहितीसह राज्य ग्रंथालय परिषदेवर नियुक्ती करण्यासाठी एकूण 03 स. सदस्यांची नांवे निश्चीत करण्यासाठीचा शासनास सादर करण्याचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय** :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहरांना तारांकित नामांकन देण्याबाबत

**संदर्भ** :- 1) शासन निर्णय क्रं. स्वमअ-2015/प्र.क्र.23/नवि-34 दिनांक 15 मे 2015

2) शासन निर्णय क्रं. स्वमअ-2019/प्र.क्र.82/नवि-34 दिनांक 24 मे 2019

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अमलबजावणी संदर्भाधीन दिनांक 15 मे 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये संपुर्ण राज्यात **मिशन मोड** पध्दतीने सुरु आहे. या अभियानांतर्गत शहरे **हागणदारी मक्त** करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत **स्वच्छ** करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करुन राज्याचा नागरी भाग दिनांक 01 ऑक्टोंबर 2017 रोजी **हागणदारी मक्त** घोषित करण्यात आला आहे आता या अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे **स्वच्छ** करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि नागरी भागात व सार्वजनिक ठिकाणी कांही प्रमाणात होत असलेल्या अस्वच्छतेमुह नागरिकांकडून प्रतिकुल प्रतिक्रिया व्यक्त होतांना दिसुन येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता एकूणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A protocol for making cities Garbage Free) केंद्र शासनाने तयार केलेली असुन सदरची नियमावली राज्य शासनाने स्विकारली आहे. त्याच बरोबर राज्यातील कचरामुक्त शहरांना तारांकित मानांकनाची नियमावली लागू करण्यास मान्यता दिलेली आहे.

शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

* कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकनाबाबत स्वयं-घोषणा करण्यापुर्वी, शहरातील सर्व प्रभाग सदस्यांकडून संबंधीत प्रभागाचे कचरा मुक्त तारांकित मानांकनाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.
* प्रभाग सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तारांकित मानांकनापैकी जे निम्न तारांकित मानांकर असेल तेच तारांकित मानांकन त्या शहराचे तारांकित मानांकन म्हणून पडताळणीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.
* प्रभाग सदस्यांकडून तारांकित मानांकरनाबाबत घोषणापत्र सादर झाल्यानंतर संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य सस्थांनी ठराव पारित करुन सार्वजनिक घोषणा करु शकतील.
* सदर घोषणेच्या अनुषंगाने जनतेच्या हरकती व सूचना 03 दिवसांचा कालावधी देवुन मागवू शकतील.

* त्या अनुषंगाने महापौर/नगराध्यक्ष/आयुक्त/मुख्याधिकारी यांनी प्राप्त हरकती व सूचनांची पडताळणी करुन, प्रस्तावित मानांकनाच्या बाबतीत समाधान झाल्यास, कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत (1, 3, 5 व 7 तारांकित पैकी कोणतेही मानांकन) स्वयं-षोघणा करावयाची आहे.
* त्यानुसार कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकरनाबाबत शहरांने स्वयं-घोषणा करुन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करावा.
* कचरा मुक्त तारांकित मानांकनाबाबत शासनाच्या स्तरावर 1, 3, 5 व 7 तारांकित मानांकरनाबाबत केंद्र शासनाकडून पडताळणी/प्रमाणीकरण करण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.
* कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकर 1 वर्षाच्या मुदतीसाठी असेल, प्रत्येक वर्षी असा प्रकारे पुनर्मुल्यांकन व पुनरप्रमाणीकरण केले जाईल.
* कचरा मुक्त शहराचे कोणतेही तारांकित मानांकन मिळविण्यासाठी स्वयं-घोषणेच्या प्रणालीमध्ये तसेच प्रत्यक्ष शहर कचरा मुक्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये शहरातील नागरिकांचा सक्रिया सहभाग असणे आवश्यक आहे.
* **कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकन ठरवितांना विचारात घेतली जाणारी 10 उपांगे / बाबी पुढील प्रमाणे आहेत.**

1- घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे (Door to Door Collection)

2- निर्मितीच्या जागीच कच-याचे विलगीकरण करणे (Segregation at source)

3- सार्वजनिक, वाणिज्य व रहिवाशी भागातील साफसफाई करणे तसेच मलनिस्ससारण व नदी-नाल्यांचे पृष्ठभाग स्वच्छ करणे (Sweeping of public, commercial and residential areas (No visible eyesores on streets) and cleaning of storm drains and surface of water bodies))

4- शहरातील कचरा पेटया आणि पदार्थ पुनर्प्राप्ती सुविधा (Waste storage Bins, Litter Bins and Material recovery facility)

5- मोठया प्रमाणात कचरा निर्माण करणारे व रहिवाशी कल्याण संघ यांचेकडून नियमांचे पालन (Bulk waste Generators and Residential Welfase Associations compliance).

6- कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे, शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपणाभूमी तयार करणे आणी बांधकामाचा राडा-रोडा (Scientific Waste Proceesing, Scientific Landfill and C&D Waste).

7- अस्वच्छतेबाबत शिक्षा, दंड व वापरकर्ता शुल्क आकारणी तसेच प्लॉस्टीक बंदीची अमलबजावणी (User Fees, Penalties, Spot Fines for littering and enforcement of ban on thin plastic)

8- नागरिकांच्या समस्यांचे निराकरण व अभिप्राय प्रणाली (Citizen grievance redressal and feedback system)

9- कच-याच्या ढीगांचे निर्मुलन करणे (Eradication of crude dumping of garbage and dump remediation)

10 शहरांतील गटारांची व नैसर्गिक जलसाठयांची स्वच्छता (Cleaning of storm water drains and surface of water bodies)

11 कालानुरुप कचरा निर्मितीचे प्रमाण घटविणे (Waste reduction application of 3-R principles of MSW)

12 शहर सौंदर्यीकरण (City Beatification)

उपरोक्त नमुद कार्यपध्दतीनुसार स्वयं-मुल्यांकन व स्वयं पडताळणी करुन कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकनाबाबत स्वयं घोषणा करण्याची कार्यवाही करुन प्रस्ताव राज्य अभियान संचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

कचरा मुक्त शहरांचे तारांकित मानांकन ठरवितांना विचारात घेतली जाणारी जी 10 उपांगे / बाबी आहेत, त्यापैकी जास्ती जास्त बाबींची प्रभावीपणे अमलबजावणी केल्यामुळे नांदेड शहर 3 तारांकिन मानांकन प्राप्त होण्यास पात्र आहे. करिता कचरा मुक्त शहराचे 1, 3, 5 व 7 पैकी तारांकित मानांकन बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या समंती व निर्णयास्तव सादर

**(मा. महापौर यांच्या मान्येतेने)**

**स्वाक्षरीत/-**

**( स. अजीतपालसिंघ संधू )**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**